वर्ष- १० | अंक- ३५ | मुंबई, मंगळवार, १६ जुलै ते २२ जुलै २०२४ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024
मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 गुंतवणुकीचा मोह महिलेला पडला महागात

3 → एफडीआय हवीच, पण अंकुशासह

पावसाळ्यात त्वचेला जपण्यासाठी 'हे' आहेत खास उपाय ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# मिरारोड व नालासोपाऱ्यातील ज्वेलर्सच्या दरोड्यातील १७ वर्ष फरार गुन्हेगारास पकडण्यात पोलिस ठरले यशस्वी

नालासोपारा- मध्यवती गुन्हे प्रकटीकरण शाखेने १७ वर्षापासून फरार असणारा मिरारोड व नालासोपारा येथिल ज्वेलर्सवर रिव्हाल्वर व चॉपरचा धाक दाखवून दरोडा टाकणाऱ्या दोन गुन्हयातील आरोपीस केली अटक. मिळालेल्या माहितीनुसार मुकेश नामालाल जैन याचे शॉप नं. ११, टोपाझ शॉपींग सेंटर, तुळींज रोड, नालासोपारा पुर्व येथे सरगम गोल्ड नांवाचे ज्वेलसर्चे दुकान होते. दिनांक २४.०२.२००८ रोजी सकाळच्या दरम्यान फिर्यादी हे आपल्या दुकानात बसले असतांना आरोपी दागीने पहाण्याचा बहाणा करुन दुकानात प्रवेश करुन फिर्यादीस रिव्हाल्वर व चॉपरचा धाक दाखवून मारहाण करुन दुकानातील कॅबीनमध्ये फिर्यादी यांचे हातपाय बांधुन कोंडुन ठेवून दुकानातील ४०,१०,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागीने, नोकीया कंपनीचा मोबाईल फोन दरोडा टाकुन चोरी करुन पळून गेले. याबाबत नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता .

सदर गुन्हयाच्या तपासात आरोपी १) वसंत चांगदेव म्हात्रे २) सौ. बायणबाई रामराव वाघमारे ३) सौ.कुसुम दिलीप कोरडे ४)सौ. इंदुबाई दत्तराव लोंबणे ५) दिपक जगदीश रोडा यांना गुन्हा दाखल झाल्यानंतर अटक करुन त्यांचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते परंतु फरार आरोपी जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे रा. नांदेड हा गुन्हा दाखल झालय पासुन पोलीसांना मिळुन येत नव्हता.त्यामुळे मा. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेण्याचे आदेश पोलिसांना दिले होते वरील गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे रा. नांदेड यांचा यापुवी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १६ वर्षापासुन मिळुन येत नव्हता.




त्याअनुषंगाने मध्यवती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी १ ) पोउपनिरी. हितेंद्र विचारे, २)पोहवा. राजाराम काळे ३) पोहवा. हनुमंत सुयर्वंशी ४) पोशि. अकिल सुतार ५) पोशि . साकेत माघाडे ६)पोशि. नितीन राठोड असे तपास पथक तयार केले. नमुद पथकाने सदर गुन्हयाची नालासोपारा पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन त्यांनतर सलग ०१ महिन्यांपासुन अहोरात्र मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून आरोपीची गोपनीय माहिती काढली असता पोशि. नितीन राठोड यांना आरोपी जॉनी ऊर्फ जर्नादन वाघमारे हा नांदेड ऐवजी सध्या मु. भांडेगाव, ता. जि. हिंगोली येथे राहत असल्याची माहीती समजली. त्यावेळी पोलीस पथकाने हिंगोली या ठिकाणी जावून नमुद गावात सापळा लावला. आरोपीबाबत खात्री होताच स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपीस दिनांक १२.०७.२०२४ रोजी शिताफिने ताब्यात घेतले पोलिसांनी आरोपीकडे केलेल्या तपासात आरोपी हा सन २००७ मधील मिरारोड पोलीस ठाणे येथील दाखल गुन्हा शस्त्रासह दरोडयाच्या गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे आढळून आले असून त्याचे पुर्ण नांव जर्नादन ऊर्फ जॉनी रामराव वाघमारे, वय - ४३ वर्षे रा.भांडेगाव, ता.जि. हिंगोली असे असल्याचे निष्पन्न झाले आहे. नमुद आरोपीस पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

अशा प्रकारे ज्वेलर्सच्या दुकानांवर सशस्त्र दरोडा टाकुन लाखो रूपयांचे सोन्याचे दागिने लुटणाऱ्या १७ वर्षापासून पाहीजे असणाऱ्या आरोपीस पकडण्यात मध्यवती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आले आहे. आरोपीवर यापुवी १)हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे( ६ गुन्हे )२)भाग्यनगर पो.स्टे., नांदेड( ३ गुन्हे )३)लिंबगांव पो.स्टे. हिंगोली४) सीटी कोतवाली पो.स्टे. अमरावती५) चिखली पोलीस ठाणे, हिंगोली ६) सेनगांव पोलीस ठाणे, हिंगोली असे एकूण १३ गुन्हे नोंद आहेत.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक / राहुल राख, सपोनि/ नितीन बेन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सफौ / श्रीमंत जेधे तसेच पोहवा. राजाराम काळे, हनुमंत सुयर्वंशी, मनोहर तावरे, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, संतोष मदने आसीफ मुल्ला, राजविर संधु, प्रविणराज पवार, सतिष जगताप, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, अनिल नागरे, पोअंम / अखिल सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ / संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केली आहे.

## सशस्त्र चड्डी गँगची खारघरमध्ये दहशत

### चोरट्यांचे कारनामे सीसीटीव्हीमध्ये चित्रीत

पनवेल : खारघरमधील ओवे पेठ गावात सशस्त्र चड्डी गँगचा वावर असल्याचे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे. अर्धनग्न अवस्थेत हातात धारदार शस्त्र घेऊन रात्रीच्या वेळेस सोसायट्यांमध्ये चोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या चोरट्यांच्या दहशतीने खारघर परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे.

खारघर परिसरातील ओवे पेठ गावात ४ ते ५ चोरटे एका बिल्डिंगमध्ये सावधरीत्या शिरताना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहेत. हे चोरटे आजूबाजूचा कानोसा घेत हलक्या पावलांनी बिल्डिंगमध्ये चोरी करण्यास जात असताना दिसत आहेत. गुरुवारी मध्यरात्री ३ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला असून चोरटे अर्धनग्न अवस्थेत बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये दबा धरून बसल्याचेही दिसून येत आहे.




धक्कादायक बाब म्हणजे या चोरट्यांकडे कोयता तसेच कडी-कोयंडे तोडण्यासाठी मोठमोठे शस्त्रे असल्याचेही सीसीटीव्हीमध्ये दिसत आहे. चोरट्यांनी या भागातील तीन ते चार घरांचे टाळे तोडल्याचे समजते.अमोल पाटील यांच्या इमारतीतील एका भाडेकरूच्या बंद घराचे कुलूप तोडून ८ ते ९ हजार रुपयांची चोरी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. तसेच अजय शेळके यांच्या बंद घराचे कुलूप तोडले असून झंकार ब्रास बॅण्डच्या ऑफिसचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचेही समजते. हे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर चोरट्यांच्या दहशतीने खारघर परिसरातील नागरिकांमध्ये चांगलीच घबराट निर्माण झाली आहे. पोलिसांनी लवकरात लवकर या चोरट्यांना जेरबंद करावे, अशी मागणी रहिवासी करत आहेत.

## अपंग ग्रामसेवकास धमकावल्याप्रकरणी गुन्हा

**शहापूर**: तालुक्यातील खराडे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक बाळचंद घायवट (५२) यांना ग्रामपंचायत सदस्यांनी शिवीगाळ व धमकावल्याप्रकरणी ग्रामपंचायतीचे ३ सदस्य व १ ग्रामस्थ यांच्या विरोधात किन्हवली पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.खराडे ग्रामपंचायतीचे नवीन कार्यालय हद्दीतील चांग्याचापाडा येथे बांधण्यात आल्याने गावातील दोन गटात मतभेद असून त्यातील एका गटाने ग्रामसेवक घायवट यांना जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच कार्यालयातील कागदपत्रे पाहण्याची मागणी केली असता रितसर अर्ज द्या, त्याप्रमाणे कागदपत्रे देतो असे ग्रामसेवकाने म्हटल्यावरुन शिवीगाळ केली असल्याचा आरोप ग्रामसेवक यांनी दाखल गुन्ह्यात केला आहे.

## ट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**भिवंडी**: पतीसह दुचाकीवरून जात असलेल्या जोडप्याच्या दुचाकीला अवजड ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात पाठीमागे बसलेली महिला जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना भिवंडीतील डॉ. एपीजे अब्दुल कलाम उड्डाणपुलावर बुधवारी दुपारी घडली आहे.या घटनेने शहरात हळहळ पसरली असून शहरात अवजड वाहनांना बंदी असतानाही अवजड ट्रक रस्त्यावर कसे धावतात असा प्रश्न नागरिक विचारत असून अवजड वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तेहसीन शहाबाज अंसारी असे महिलेचे नाव असून महिला आपल्या पतीसह महापोली गावातील एका शाळेत शिक्षिकेचे काम करत होती.मागील वर्षभरापूर्वीच तिचा विवाह झाला होता.बुधवारी ही महिला पती शहाबाज अंसारी यांच्यासह दुचाकीवरून वंजारपट्टी नाका येथील डॉ. एपीजे अब्दुल कलाम उड्डाणपुलावर आली असता ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे.सुदैवाने या अपघातात पती शहाबाज हा वाचला असून त्यास जखमी अवस्थेत खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शहरात अवजड वाहनांना बंदी असतानाच भर दुपारी अवजड वाहने उड्डाणपूलांवरून सोडली जात असल्यानेच महिलेचा मृत्यू झाला आहे.

## आरोपींना आश्रय देणे पडले महागात

**उल्हासनगर** : पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर पाच ते सहा जणांच्या टोळीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना मे महिन्यात घडली होती. या हल्ल्यातील आरोपींना उल्हासनगर पोलिसांनी सापळा रचत माळशेज घाट येथून अटक केली.या आरोपींना माळशेज मधील करंजाळे येथील शेतघरात आश्रय दिल्या प्रकरणी डोंबिवलीतील विघ्नहर्ता ट्रस्टच्या सचिव आणि शेतघराच्या मालकीण गीता खरे यांच्यासह चार जणांवर उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

उल्हासनगर कॅम्प पाच मधील गांधी रोड परिसरात रोहित सिंग लबाना राहतो. त्याचे सोहम पवार आणि यश पवार यांच्यात अनेक महिन्यापासून किरकोळ वाद होते. २६ मे च्या मध्यरात्री रोहित सिंग लबाना आणि त्याचा मित्र गोलमैदान याठिकाणी गेले असता साहिल पवार, सोहन पवार, यश पवार, बिन्नी सोनवणे, सोहिल तोमर, आर्यन पवार यांनी जुन्या रागातून जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात रोहित हा गंभीर जखमी झाला होता. या हल्ल्या प्रकरणी उल्हासनगर पोलिस ठाण्यात जीवेठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा करून हल्लेखोर फरार झाले होते.

३० मे रोजी उल्हासनगर पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार माळशेज घाट येथील फार्म हाऊसवर आरोपी असल्याची माहिती मिळाली. रात्रीच्या वेळेत ओतूर पोलिसांच्या मदतीने उल्हासनगर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पत्रे, उपनिरीक्षक समाधान हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक पोलीस पथक करंजाळे येथे पोहचले. त्यांनी शेतघरावर छापा टाकला असता तेथे १५ जण होते. सहाजण पोलिसांना पाहून पळून गेले. शेतघराचे व्यवस्थापक प्रतिक ठाकरे यांना पोलिसांनी या शेतघरातील व्यक्तींची नावे वाचून दाखवून ते येथे राहतात का म्हणून विचारणा केली. प्रतिकने अटल शुक्ला याच्या सूचनेवरून सोहन पवार, धीरज रोहेरा, यश पवार येथे राहत आहेत असे सांगितले. हेच गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी असल्याची खात्री पटल्यावर पोलिसांनी त्यांना अटक केली.

अटल शुक्ला याने शेतघराचा व्यवस्थापक प्रतिक ठाकरे यांना सोहन पवार, धीरज रोहरा, यश पवार यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था कर अशी सूचना केली होती. त्यामुळे तिघांना या शेतघरात आश्रय मिळाला होता, असे पोलीस तपासात उघड झाले. अटल शुक्लाला गोपाळ सत्यवान पाटील (रा. म्हारळ) याने शेतघराचा संदर्भ दिला होता. तीनजण गंभीर गुन्ह्यातील आरोपी आहेत हे माहिती असूनही त्यांची माहिती पोलिसांपासून लपवली आणि गुन्हेगारांना शेतघरात आश्रय देण्यासाठी पुढाकार घेतला म्हणून पोलिसांनी म्हारळ गाव येथे राहणारे रुतिक उर्फ अटल अनिल शुक्ला, गोपाळ सत्यवान पाटील, कल्याण योगीधाम येथे राहणारे सुमित सत्यवान सैनी, शेतघराचे व्यवस्थापक प्रतिक जनार्दन ठाकरे आणि शेतघराच्या मालकीण गीता खरे यांच्या विरोधात उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## इमारतीचा भाग कोसळून दोन महिला जखमी

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील जोशीबागेतील आझादनगरमध्ये एक मजली धोकादायक इमारतीचा काही भाग शेजारी असलेल्या जुलेखा चाळीवर कोसळला. सायंकाळी साडे चारच्या सुमारास ही घटना घडली. यावेळी चाळीतील एका घरात झोपलेल्या दोन महिला जखमी झाल्या आहेत. हसरत गुलाम हुसेन (८०) आणि नर्गिस शेख (२९ ) अशी त्यांची नावे आहेत. या घटनेत दोघी किरकोळ जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुर्घटनेची माहिती मिळताच कल्याण-डोंबिवली महापालिकेचे अधिकारी, अग्नीशमन दलाचे जवान तसेच पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

## ४ लाख ९७५२३/- व्यवसाय गुंतवणुकीतील फसवणूकीची रक्कम पोलिसांनी केली परत

वसई : सायबर पोलीस ठाणे यांनी Investment Scheme/Task Fraud द्वारे ऑनलाईन फसवणूक झालेल्या तक्रारदार यांना ४,९७,५२३/- रक्कम यशस्वी रीत्या केली परत. मिळालेल्या माहितीनुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे सिन्हा यांना विविध टास्कमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून सुरुवातीला काही रक्कम अदा करून विश्वास संपादन केला. त्यानांतर मोठया रक्कमेची गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगुन तक्रारदार यांना वेळोवेळी रक्कम भरण्यास सांगुन तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक करण्यात आली . झालेल्या प्रकार बद्दल सिन्हा यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिनांक ०१/०५/२०२४ रोजी नोंदवली .

या तक्रारीच्या अनुषांगाने तक्रारदार यांचा झालेल्या व्यवहाराचे सायबर कक्षाद्वारे अवलोकन करण्यात आले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यावर वळती झाल्याची माहिती प्राप्त झाली. सदर माहितीच्या अनुषंगाने संबंधीत बँकेला पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम खात्यात गोठवण्याबाबत कळवण्यात आले. तक्रारदार यांची रक्कम संशयीत खात्यांमध्ये गोठवण्याची माहिती प्राप्त होताच मा. न्यायालयाकडे तक्रारदार यांची रक्कम परत त्यांना मिळण्याकरीता कारवाई करण्यात आली. मा. न्यायालयाकडे सदरबाबत पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी ४,९७,५२३/- रु रक्कम त्यांचे मुळ खात्यावर परत मिळवण्यात आलेली आहे. सदरची कामगीर श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व. वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनी/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, मपोअं पल्लवी निकम, मपोअं/ स्नेहल पुणे, मसुब/प्रविण सांवत यांनी पार पाडली आहे.

## ५ लाख ०७६७६/- पार्ट टाईम जॉब साठी फसवणूक झालेली रक्कम पोलिसांनी केली परत

भाईंदर - Telegram Channel वरील Part Time Job मध्ये ऑनलाईन रेटिंग देण्याचे सांगुन तक्रारदार यांची फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी ५,०७,६७६/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश . मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील विरार पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार झा यांनी टेलीग्राम ॲपवर पार्ट टाईम जॉबची जाहिरात पाहिली. जाहिराती मध्ये ऑनलाईन प्रॉपर्टीना रेटिंग दिल्यावर काही रक्कम मिळणार असल्यबाबत नमुद केले होते. रेटिंग देण्याकरीता टास्क विकत घेण्याबाबत सांगण्यात आले त्यावरून तक्रारदार यांनी काही टास्क विकत घेतले. परंतु त्यांना कोणताही परतावा न देता आर्थिक फसवणुक करण्यात आली यावरून तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरून सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवण्यात आली .

तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज प्राप्त होताच सायबर कक्षाने झालेल्या व्यवहाराची संविस्तर माहिती घेवुन संबंधीत बँकेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम गोठवण्यात आली. विरार पोलीस ठाणे येथील गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन प्राप्त तक्रार अर्ज तसेच गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे यांच्याकडुन तपास करण्यात आला. नमूद तक्रारी अर्जाचे तसेच गुन्हयाच्या अनुषंगाने संबंधीत बँकेसोबत वेळोवेळी पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम वेळीच संशयीत बँक खात्यांमध्ये गोठवण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांची रक्कम त्यांचे मुळ खात्यात जमा होणेकरीता वेळोवेळी संबंधीत बँकेसोबत पाठपुरावा करण्यात आल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी ५,०७,६७६/- रु त्यांचे मुळ खात्यात परत मिळवण्यात आलेली आहे. सदरची कामगीर श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व. वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनी/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, मपोअं पल्लवी निकम, मपोअं/ स्नेहल पुणे, मसुब/प्रविण सांवत यांनी पार पाडली आहे.

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी

- Telegram Channel, facebook, Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channe', Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे. याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास सांपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवून फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
- Work From Home नावाखाली Online Youtube Vedio Link Task, Hotel / Movie Rating या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातीना बळी पडु नये.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखववणा-या कोणत्याही ट्रेडींग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडींग ॲपची विश्वासनियता तपासल्या शिवाय गुंतवणुक करु नये.
- Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वित्तीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- कोणती ही अनाधीकृत ॲपप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www. cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८०१३५.


सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in

# गुंतवणुकीचा मोह महिलेला पडला महागात

## ३.९५ लाखांची फसवणूक

**मुंबई** : स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याबाबत सोशल मीडियावर आलेल्या जाहिरातीवर विश्वास ठेऊन गुंतवणूक करणे महिलेला चांगलेच महागात पडले आहे. सायबर ठगांनी या महिलेला ३ लाख ९५ हजार रुपयांना गंडा घातला असून, या प्रकरणी मुलुंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुलुंडमधील रहिवासी असलेल्या ५१ वर्षीय तक्रारदार यांचे पती स्पेनमध्ये जहाजावर नोकरीला आहेत. ३१ मार्चला फेसबुकवर सर्फिंग करत असताना त्यांना रचना रानडे यांच्या स्टॉक मार्केट ग्रुपला जॉईन होण्यासंबंधित एक जाहिरात पोस्ट दिसली. तक्रारदार यांनी पोस्टमधील



लिंकवर क्लिक केले. त्यानंतर, एक गुगल फॉर्म (अर्ज) ओपन झाला. तक्रारदार यांनी त्यात सर्व माहिती भरली. लगेचच त्यांना एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये अ‍ॅड करण्यात आले. ग्रुपमध्ये स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणुकीवर होणाऱ्या नफ्याबाबत चर्चा सुरू होती. तक्रारदार यांनी गुंतवणूक करण्याचे ठरवत ग्रुपवर विचारणा केली. पुढे, त्यांना एक लिंक पाठवून अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगण्यात आले. तक्रारदार यांनी गुंतवणूक करण्यास सुरुवात केली.

गुंतवणूक जशी वाढत होती, तसा आभासी खात्यात नफ्याच्या रकमेत वाढ होत होती. याच मोहात तक्रारदार यांनी ३ लाख ९५ हजार रुपयांची गुंतवणूक केली. त्यानंतर, त्यांनी आभासी खात्यातील पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडे अधिक पैशांची मागणी करण्यात आली. त्यामुळे आपली फसवणूक होत असल्याचा तक्रारदार यांना संशय आला.तक्रारदार यांनी एका नातेवाइकाला घडलेला प्रकार सांगितला असता, त्यांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. अखेर, तक्रारदार यांनी मुलुंड पोलीस ठाण्यात जात ३ लाख ९५ हजार रुपयांच्या ऑनलाइन आर्थिक फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# रिफंडच्या नादात वृद्धेने गमावले ५२ हजार

**मुंबई** : सायबर ठगांच्या भूलथापांना बळी पडून रिफंडची रक्कम परत मिळवण्याच्या नादात अंधेरीतील ७२ वर्षीय वयोवृद्ध महिलेने ५२ हजार ९०० रुपये गमावल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून अंधेरी पोलीस तपास करत आहेत.

अंधेरी पूर्वेकडील चकाला परिसरात पतीसोबत राहात असलेल्या ७२ वर्षीय तक्रारदार यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, १७ मार्चला त्यांनी अ‍ॅमेझॉनकडे अडकलेली काही रक्कम रिफंड मिळवण्यासाठी गुगलवर अ‍ॅमेझॉनच्या ग्राहक सेवेचा क्रमांक शोधला. मिळालेल्या नंबरवर त्यांनी संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितला. समोरुन बोलणाऱ्या व्यक्तीने पैसे रिफंड करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून बँकेच्या क्रेडिट आणि डेबिट कार्डची माहिती घेतली.मोबाईलवर आलेला ओटीपी कोणाला सांगू नका, असे सांगून त्याने कॉल फॉरवर्ड केला. त्यानंतर काही वेळातच तक्रारदार यांच्या खात्यातून ५२ हजार ९०० रुपये वजा झाल्याचा संदेश आला. आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात येताच तक्रारदार यांनी बँकेत कॉल करून कार्ड ब्लॉक केले. त्यांनतर त्यांनी सायबर पोलिसांच्या १९३० हेल्पलाईनवर आणि अंधेरी पोलीस ठाण्यात जात ऑनलाइन आर्थिक फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# हातचलाखीने एटीएम कार्ड लंपास करून ४० हजार रुपयांना गंडा

**मुंबई** : मुलाला कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याने पैसे काढण्यासाठी एटीएम सेंटरवर गेलेल्या एका रिक्षा चालकाला पैसे काढण्यास मदत करण्याच्या बहाण्याने ठगाने हातचलाखीने एटीएम कार्ड लंपास करून ४० हजार रुपयांना गंडा घातल्याची घटना बोरिवलीमध्ये घडली. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून बोरिवली पोलीस अधिक तपास करत आहेत.

कांदिवली पूर्वेकडील आकुर्ली रोड परिसरात कुटुंबासोबत राहात असलेले रामानुज वर्मा (४४) हे व्यवसायाने रिक्षा चालक आहेत. कांदिवली आणि बोरिवली परिसरात रिक्षा चालवून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर ते कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. मोठ्या मुलाला कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी त्यांना पैशांची आवश्यकता होती. त्यामुळे, बुधवारी दुपारी रामानुज हे बचत खात्यामधून पैसे काढण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या वझीरा नाका शाखेच्या एटीएम सेंटरवर गेले.

रामानुज यांना एटीएममधून पैसे काढता येत नसल्याने येथे उभ्या असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने त्यांना मदतीची विचारणा केली. त्याने रामानुज यांच्याकडून डेबिट कार्ड घेत ते एटीएम मशीनमध्ये टाकले आणि त्यांना पिन नंबर विचारला. पैसे काढायचे असल्याने रामानुज यांनी त्याला पिननंबर सांगितला. पण, त्याने डेबिट कार्डमध्ये प्रॉब्लेम असल्याने पैसे निघत नसल्याचे रामानुज यांना सांगितले.

डेबिट कार्ड रामनुज यांना देऊन तो व्यक्ती तेथून निघून गेला. रामानुज यांनी डेबिट कार्ड तपासले असता ते डेबिट कार्ड अन्य कोणत्या तरी व्यक्तीच्या नावावर असल्याचे त्यांना दिसले. रामानुज यांनी लगेचच बँकेत धाव घेत येथील कर्मचाऱ्यांना घडलेला प्रकार सांगितला. बँक कर्मचाऱ्यांनी बचत खात्यामधून डेबिट फ्रीझ केले. पण, तोपर्यंत रामानुज यांच्या खात्यातून चार व्यवहार करत ४० हजार रुपये काढण्यात आले. अखेर, त्यांनी बोरिवली पोलीस ठाणे गाठून अनोळखी व्यक्तीविरोधात फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# मुलीचा विनयभंग करणाऱ्यास २० वर्षांची शिक्षा

**ठाणे** : ठाण्याच्या कापूरबावडी पोलीस ठाण्यात जून, २०१८ रोजी दाखल विनयभंग आणि पोक्सो अंतर्गत गुन्ह्यात ५६ वर्षीय विजय नारायण पटगार याला विशेष पॉक्सो न्यायालयाने शिक्षा सुनावली. सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी युक्तिवाद केला. तर तपास अधिकारी महिला पोलीस उपनिरीक्षक अश्विनी बी. जाधव यांनी परिस्थितीजन्य पुरावे सादर केले. जिल्हा सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सेशन न्यायाधीश आर.यु.मालवणकर यांनी आरोपीस विनयभंग, ठार मारण्याची धमकी, प्रकरणी दोषी धरीत २० वर्षांचा सश्रम कारावास आणि २० हजाराचा दंड अशी शिक्षा ठोठावली.

ठाण्याच्या कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत जैन मंदिराजवळ,



चितळसर येथे राहणाऱ्या १६ वर्षीय मुलीचा विनयभंग करून तिला ठार मारण्याच्या धमकी बाबत गुन्हा दाखल झाला होता. खटला हा विशेष विशेष पॉक्सो न्यायालयात न्यायाधीश आर.यु.मालवणकर यांच्या दालनात अंतिम सुनावणी सुरु होती. या प्रकरणात सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी युक्तिवाद करत तपास अधीकारी पो.उपनि. अश्विनी जाधव यांनी दिलेले तत्सम पुरावे ग्राह्य धरून आरोपी विजय नारायण पटगार याला दोषी ठरवण्यात आले. आरोपी पटगार हा पीडितेच्या मानलेला मामा होता. घटनेच्या दिवशी पीडितेचा वडील दारू पिउन आल्याची संधी साधून पीडितेचा विनयभंग केला. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली होती. न्यायाधीश आर.यु.मालवणकर यांनी आरोपीला शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम २० हजार न भरल्यास २ वर्षांची सश्रम शिक्षा भोगावी लागल्याचे निकालात नमूद केले.

# बँकॉकहून मुंबईत २ कोटींच्या गांजाची तस्करी

**मुंबई** : बँकॉक येथून मुंबईत करण्यात येत असलेल्या उच्च प्रतीच्या गांजाची तस्करीचा प्रयत्न हवाई गुप्तचर कक्षाने (एआययू) हाणून पाडत तब्बल दोन कोटी रुपये किमतीचा सुमारे साडेचार किलो गांजा जप्त केला आहे. एआययूने या प्रकरणी फिजा खान (३७) नावाच्या महिलेला बेड्या ठोकल्या आहेत. एआययूने दिलेल्या माहितीनुसार, चेंबूर येथील रहिवासी असलेल्या फिजा खान हिने यापूर्वी देखील गांजाची तस्करी केली होती. या वेळी ती एआययूच्या जाळ्यात सापडली. बँकॉकहून एक महिला मोठ्या प्रमाणात ड्रग्ज घेऊन येणार असल्याची माहिती एआययूच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार, एआययूच्या पथकाने रविवारी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सापळा रचला.

फिजा खान विमानतळावर उतरताच एआययूने तिला ताब्यात घेतले. तिच्याकडील बॅगेच्या तपासणीत गांजाची ९ पाकिटे सापडली. यात उच्च प्रतीचा ४ हजार ३७३ ग्रॅम गांजा होता. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारात १ कोटी ९५ लाख रुपये किंमत आहे. या प्रकरणी अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून फिजा खान हिला अटक करण्यात आली आहे. एआययूने तिच्या साथीदार आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# बनावट सीम वापरून धमकावणाऱ्यांचा पर्दाफाश

## कॉल सेंटरचे साहित्य जप्त, तिघांना अटक

**ठाणे** : दुसऱ्याच्या नावाच्या सिमकार्डचा वापर करून लोन घेतलेल्या थकबाकीदारांना शिवीगाळ तसेच अश्लील भाषेत बोलणाऱ्या टेलीकॉल सेंटरचा पोलीसांनी पर्दाफाश केला.याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. खंडणी विरोधी पथकाने दोघांसह सिम विक्री करणाऱ्यास अटक केली. त्यांना ठाणे न्यायालयात नेले असता बुधवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

अनेकांना शिवीगाळ केल्याप्रकरणी २ जुलै रोजी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.याच प्रकरणात मोबाईल सिमकार्ड नावावर असलेल्या मंगेश हरेश



सुतारे(३४)व्यवसायाने कोळी आहेत. त्यांची चौकशी केल्यानंतर त्यांनी सांगितले अशा प्रकारचा कुठलाच नंबर आपण घेतलेला नाही. त्यानंतर सुतारे यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस पथकाने व्हीआय कंपनीचा प्रतिनिधी राहुलकुमार टिळकधारी दुबे(३३) याची कसून चौकशी केल्यानंतर त्याने कंपनीने दिलेले टार्गेट पूर्ण करण्याकरता त्याच्याकडे येणाऱ्या ग्राहकांची फसवणूक करून तीन सिमकार्ड काढून त्यापैकी एक सिमकार्ड ग्राहकाला देवून उरलेली सिमकार्ड त्याने लोन रिकव्हरी टेलीकॉल सेंटरला दिले असल्याचे सांगितले. त्याला ३ जुलै रोजी खंडणी विरोधी पथकाने अटक केली. त्याच रात्री लोन रिकव्हरी सेंटर असलेल्या भांयदर पूर्व येथे छापेमारी केली. कॉल सेंटरमधून पोलिसांनी ३ जुलै रोजी शुभम कालीचरण ओझा(२९) अमित मंगला पाठक(३३)या दोघांना अटक केली.या दोघांनी कॉल सेंटर मधून लोन घेतलेले नसलेल्यांना देखील अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

# अक्षता म्हात्रे खून खटला जलदगती न्यायालयात चालवा

## माजी नगरसेवक वास्कर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नवी मुंबई** : अक्षता म्हात्रे (आगासकर) खून खटला जलदगती न्यायालयात चालवावा आणि आरोपींना सजा ए मौत (फाशी) द्यावी, अशी मागणी माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

नवी मुंबई, कोपरखैरणे गावची अक्षता म्हात्रे (आगासकर) हिची ६ जुलै २०२४ रोजी शिळ टेकडीवरील घोळ गणपती मंदिरातील पुजारी व इतर सहकाऱ्यांनी सामूहिक बलात्कार करून निर्घृण हत्या केली. मृत अक्षता हिचे ४ वर्षांपूर्वी बेलापूर गावातील कुणाल म्हात्रे या युवकाबरोबर लग्न झाले होते. तिला २ वर्षांचे लहान बाळ आहे. ६ जुलै २०२४ रोजी मी अक्षता हिचे पती कुणाल व सासू-सासरे यांच्यासोबत भांडण झाल्या कारणाने ती मानसिक तणावात होती. त्या रागातून तिने घर सोडले व मनःशांतीसाठी शिळ टेकडीवरील घोळ गणपती मंदिरात गेली होती. दरम्यान, तेथील पुजारी श्यामसुंदर शर्मा, संतोषकुमार मिश्रा आणि राजकुमार पांडे या नराधमांनी तिच्यावर सामूहिक बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केली. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी आपल्या न्यायालयीन व्यवस्थेपुढे हा खटला वर्षानुवर्षे चालेल आणि अक्षता ही न्यायापासून वंचित राहील. अक्षता ही आपल्या ढिसाळ पोलीस यंत्रणेचा बळी आहे. कारण, ज्या दिवशी ती मानसिक तणावातून घरातुन निघुन गेली. त्याच दिवशी साधारणतः दोन तासांत तिचे पती कुणाल म्हात्रे यांनी त्यांच्या पत्नीने रागातून घर सोडल्याचे पोलिसांना कळवले होते. त्यानंतर ते परत तिचा तपास करावा, अशी विनंती करण्यासही गेले; परंतु स्थानिक पोलिसांनी त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. त्यांनी अक्षता हिचा तपास केला नाही. जर त्याच वेळी तिचा सीडीआर तपासून व तिचे मोबाईल लोकेशन पोलिसांनी तपासले असते, तर कदाचित अक्षताचा बळी गेला नसता व तिच्या लेकरावरही तिची ममतेची छाया राहिली असती.

एकीकडे राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जोरात सुरू आहे. सर्व बहिणी या योजनेचे लाभ घेण्यासाठी शासकीय कार्यालय, महा ई-सेवा केंद्र व राजकीय कार्यालयात रांगा लावत आहेत; परंतु त्यातली एक बहीण मनःशांतीसाठी मंदिरात गेली असता तिला सामूहिक बलात्कार व मृत्यूस सामोरे जावे लागले. तिला जर न्याय द्यावा, असे आपणांस वाटत असेल, तर हा खटला जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायालयात घेऊन या खटल्यातील आरोपींना लवकरात लवकर फाशी द्यावी. सोबतच आपल्या ढिसाळ स्थानिक पोलीस यंत्रणेच्या चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यांचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि गृह राज्यमंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे लेखी पत्र पाठवून केली आहे.

# माणुसकीच्या नात्याने केलेल्या आर्थिक मदतीचा गैरफायदा

**मुंबई** : मैत्रीचा गैरफायदा घेत आर्थिक अडचणी आणि आईच्या आजारपणाचे कारण देत माणुसकीच्या नात्याने केलेल्या आर्थिक मदतीचा गैरफायदा घेतल्याची तक्रार एका पोलीस तरुणीने तिच्या मैत्रिणीविरोधात केली आहे. मैत्रिणीने केलेल्या तक्रारीवरून मैत्रिणीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून भोईवाडा पोलीस तपास करत आहेत.

नवी मुंबईतील कळंबोलीची रहिवासी असलेली ३७ वर्षीय ज्योत्स्ना मुंबई पोलीस दलात कार्यरत आहे. २०२१ मध्ये एका ब्युटीपार्लरमध्ये काम करणाऱ्या सरिता खेडेकर नावाच्या तरुणीशी तिची ओळख झाली. पुढे, सतत संपर्कात राहिल्याने दोघींमध्ये चांगले कौटुंबिक मैत्रीपूर्णसंबंध तयार झाले. कोरोना प्रादुर्भावाच्या काळात ब्युटीपार्लरसारखे लघुउद्योग डबघाईला आले होते.

सरिताने घरोघरी जाऊन सुविधा पुरवणे, तसेच ऑनलाइन ऑर्डर मिळवून सेवा पुरवणे अशाप्रकारे तिचा ब्युटीपार्लरचा व्यवसाय सुरू ठेवला होता; परंतु म्हणाव्या तशा ऑर्डर मिळवणे आणि सेवा पुरवणे कठीण असल्याने तिची आर्थिक स्थिती बिघडली आहे. आई एका दुर्धर आजाराने ग्रासली आहे, असे सांगत सरिताने ज्योत्स्नाकडे आर्थिक मदत करण्याची विनंती केली. कोरोना महामारीचा काळ संपल्यानंतर ब्युटीपार्लरचा व्यवसाय नव्याने सुरू करण्यासाठी ब्युटीपार्लर अद्ययावत करून त्याचे नूतनीकरण करण्यासाठी सरिताने ज्योत्स्नाला मैत्रीची गळ घालून तिच्याकडे व्यावसायिक भांडवलासाठी आर्थिक मदतीची मागणी केली. संकटाच्यावेळी मदत करणे या निखळ विचाराने आणि माणुसकी व मैत्रीच्या नात्याने ज्योत्स्नाने सरिताला आर्थिक मदत केली.

ज्योत्स्नाने तिला ४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र फेब्रुवारी २०२३ मध्ये आठ दिवसांच्या मुदतीत परत करण्याच्या बोलीवर दिले होते. हे मंगळसूत्र तिने वडाळा येथील एका सराफाकडे तारण ठेवून त्यावर दीड लाख रुपये रक्कम घेतली. पुढील महिन्यात ज्योत्स्नाने दिलेल्या क्रेडिट कार्डवरून तिने मोबाईल फोन विक्रेत्याकडे कार्डद्वारे ९० हजारांची खरेदी करून एक मोबाईल व काही रक्कम घेतली. सारिताने ज्योत्स्नाकडून २ लाख ४० हजार रुपये घेतले होते. ज्योत्स्नाने दिलेली रक्कम परत मागितली असता, सरिता ही वेगवेगळी कारणे देऊन टाळाटाळ करू लागली. तिने ज्योत्स्नाचे फोन उचलणे बंद केले. अखेर, सारिताने मैत्रीचा गैरफायदा घेऊन आपली फसवणूक केल्याची खात्री पटल्याने ज्योत्स्नाने भोईवाडा पोलीस ठाण्यात सरिताविरोधात तक्रार दाखल केली आहे.

# अश्लील संदेश पाठवणाऱ्या डिलिव्हरी बॉयविरोधात गुन्हा

**मुंबई** : वडापावची ऑर्डर घेऊन आलेल्या एका डिलिव्हरी बॉयने महिलेकडून तिचा मोबाईल नंबर घेत तिला अश्लील संदेश पाठविल्याची घटना शुक्रवारी गोरेगावमध्ये घडली. याप्रकरणी गुन्हा दाखल करून बांगुरनगर पोलीस अधिक तपास करत आहेत.

दहिसरमधील रहिवासी असलेल्या ४८ वर्षीय फिर्यादी या पॅरा इन्स्ट्रक्टर आहेत. त्यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या सध्या गोरेगाव पश्चिमेकडील लिंक रोड परिसरात मैत्रिणीसोबत राहतात. ५ जुलैच्या दुपारी त्यांनी स्विगी अ‍ॅपवरून मालाडमधील प्रसिद्ध मिठाई दुकानातील वडापावची ऑर्डर दिली होती. डिलिव्हरी बॉय सव्वा चार वाजता पार्सल घेऊन आला. त्याने ऑर्डर पोच केल्यानंतर घरातील वॉशरूम वापरू शकतो का? अशी विचारणा केली. डिलिव्हरी बॉयने नशा केल्याचा उग्र वास येत असल्याने तक्रारदार यांनी त्याला नकार दिला. त्यानंतर तो तेथून निघून गेला. तक्रारदार यांनी ऑर्डर दिलेले



पार्सल उघडून बघितले असता पार्सलमधून आलेली ऑर्डर चुकीची असल्याचे त्यांना दिसले. तक्रारदार यांनी स्विगी कंपनीला अ‍ॅपद्वारे फोन केला असता ऑर्डर घेऊन आलेल्या त्याच डिलिव्हरी बॉयने कॉल उचलला.

तक्रारदार यांनी त्याला ऑर्डर ही चुकीची आहे, असे सांगितले असता त्याने तुमच्या इमारती खालीच आहे. लगेच वरती येतो, असे बोलून तो परत तक्रारदार यांच्या घरी आला. त्याने तक्रारदार यांचा मोबाईल मागून घेत स्विगी अ‍ॅपवर काही तरी करू लागल्याने तक्रारदार यांनी मोबाईल परत घेतला. त्यानंतर, त्याने आपले नाव रोहित असल्याचे सांगत मोबाईल नंबर देऊन कंपनीसोबत बोलून आर्डर रिर्टन करेल, असे तक्रारदार यांना सांगून तो निघून गेला. मात्र काही वेळाने तक्रारदार यांच्या मोबाईलवर त्याने अश्लील संदेश पाठविण्यास सुरुवात केली. तक्रारदार यांनी त्याला संदेश न पाठवण्याबाबत बजावले. तसेच, पोलिसात तक्रार करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी बांगुरनगर पोलीस ठाणे गाठून रोहित नावाच्या डिलिव्हरी बॉयविरोधात तक्रार दिली आहे.

# कारच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू; चालक झाला फरार

**भिवंडी**: मुंबई - नाशिक वाहिनीवर रस्ता ओलांडताना एका ओला कार चालकाने पादचाऱ्यास जोरदार धडक दिली असता झालेल्या अपघातात पादचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.याप्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात अज्ञात कार चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर या घटनेनंतर कार चालक फरार झाला आहे.

आसबअली मोहीद्दीन मापारी (५७) असे अपघातात मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे.१८ जून रोजी रात्रीच्या सुमारास मयत आसबअली हे मुंबई - नाशिक वाहिनीवरील येथील भूमी वर्ल्ड समोरील



रस्त्यावरून रस्ता ओलांडत होते.त्यावेळी अज्ञात ओला कार चालकाने आसबअली यांना जोरदार धडक दिली.या अपघातात त्यांच्या डोक्यास,हातास व पायास मार लागून ते गंभीर जखमी झाले होते.

दरम्यान त्यांना प्रथमोपचारासाठी गंभीर जखमी अवस्थेत येथील लाईफ लाईन खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र त्यांची प्रकृती खालावल्याने अधिक उपचारासाठी १९ जून रोजी मुंबईतील केईएम हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले होते.मात्र २३ जून रोजी त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरून प्राणज्योत मालवली आहे.पोलिसांनी मृतदेह शव विच्छेदनाकरिता पाठवला आहे.तर या अपघाताची नोंद कोनगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली असून मृत आसबअली यांची मुलगी आलीया मापारी हिच्या फिर्यादीवरून ७ जुलै रोजी अज्ञात ओला चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

# गुंतवणुकीवर नफ्याचे प्रलोभन दाखवून गंडा घालणाऱ्या महाठगाला बेड्या

**मुंबई** : सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाचा (सेबी) अधिकृत दलाल असून, त्याची कंपनी सेबी नोंदणीकृत असल्याची बतावणी करत नागरिकांना शेअर मार्केटमध्ये रक्कम गुंतवल्यास भरघोस नफा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून गंडा घालणाऱ्या एका महाठगाला मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या एका विशेष पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. आशिष दिनेश कुमार शहा (४४) असे अटक आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याच्या जवळून एक किलो ९०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि २५ लाख रुपये रोख रक्कम हस्तगत केली आहे.

पश्चिम उपनगरातील वर्सोवा परिसरात राहात असलेला आरोपी ठग शहा याने तो सेबीचा अधिकृत दलाल आहे. त्याची समरयश ट्रेडिंग कपंनी ही सेबी नोंदणीकृत असल्याचे सांगून तो शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवतो. यातून मिळणाऱ्या पैशातून ऑफिस, घर, वाहने, सोने हे सर्व कमावले आहे, असे चित्र निर्माण केले. त्याने नागरिकांना शेअर मार्केटमध्ये रक्कम गुंतवल्यास वर्षाला भरघोस असा ८४ टक्के नफा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून जाळ्यात ओढले. त्याच्या राहणीमानाला भुलून आणि आमिषाला बळी पडून अनेकांनी भाबड्या विश्वासाने शहाकडे पैसे गुंतवले.

शहा याने नागरिकांचा विश्वास संपादन करण्यासाठी गुंतवणूकदारांना सुरुवातीला काही प्रमाणात परतावा दिला. त्यानंतर मात्र तो पसार झाला. गुंतवणूकदाराने दिलेल्या तक्रारीवरून वर्सोवा पोलिसांनी गेल्या वर्षी शहा विरोधात गुन्हा दाखल केला होता. गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाने हा गुन्हा तपासासाठी घेतला. मालमत्ता कक्षाने प्राथमिक पुरावे गोळा करत तांत्रिक तपासाअंती याप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपी शहा याचा शोध सुरू केला. आरोपी शहा हा मध्य प्रदेशमध्ये असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार, एक पोलीस पथक मध्य प्रदेश येथे रवाना करण्यात आले होते. पण, आरोपी शहा हा सतत ठावठिकाणे बदलत होता. पोलीस पथकाने तांत्रिक तपास आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने शहाला ताब्यात घेत अटक करून मुंबईत आणले आहे. पोलिसांनी शहाकडे केलेल्या चौकशी आणि तपासात त्याने मुंबईसह मीरा-भाईंदर आणि तामिळनाडू येथील सुमारे ४०० ते ५०० जणांना गुंतवणुकीच्या आमिषाने करोडो रुपयांना गंडा घातल्याचे उघड झाले आहे.

आरोपी ठग शहा विरोधात मुंबईसह तामिळनाडू येथे गुन्हे दाखल असण्याची शक्यता आहे. आरोपी शहाकडे कसून चौकशी करण्यात येत असून, त्याने नेमक्या किती नागरिकांना किती रुपयांना गंडा घातला याची चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार, १६ जुलै ते २२ जुलै २०२४


## संपादकीय

# युद्धभूमी मणिपूर



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

वर्ष उलटून गेलं, मणिपूर काही शांत व्हायला तयार नाही. सुरळीत, पूर्वपदावर या सगळ्या पुढच्या पायऱ्या. आधी शांत तर व्हावं. पण, मैतेयी आणि कुकी या दोन जमातीतला संघर्ष अजूनही मिटायला तयार नाही. तो धुमसतोच आहे. इकडल्या किंवा तिकडल्या मणिपुरींचे जीव घेतो आहे. रशिया-युक्रेन युद्धाचा आणि त्यात होणाऱ्या हिंसेच्या बातम्या भारतीय माध्यमांत ठळकपणे येतात, पण दुर्दैवाने मणिपूरमधील घडामोडींबाबत तेवढं सातत्य नाही. ईशान्येकडच्या वृत्तपत्रांत, खाजगी वाहिन्यांत त्यांचं प्रतिबिंब काही प्रमाणात दिसतं. पण, त्यातही सकारात्मक घडामोडी नसतात. हा प्रश्न चिघळणं खुद्द मणिपुरींसाठीच कसं तोट्याचं आहे, मणिपूरमध्ये शांतता नांदणं, तिथली परिस्थिती पूर्ववत होणं कसं आवश्यक आहे, हे लोकांत जाऊन समजावणारं तिथे कोणी नाही. कोणाचे त्यादृष्टीने प्रयत्नही नाहीत, ही सर्वात खेदाची बाब आहे. जर प्रत्यक्ष जनसमूहात काही घडत नसेल, तर माध्यमं तरी काय देणार? राजकीय पातळीवर पाहिलं तर गेल्या लोकसभेच्या शेवटच्या अधिवेशनात शेवटचा अविश्वास ठराव विरोधी पक्षांनी याच मुद्द्यावर आणला होता. त्यानंतर लोकसभेच्या निवडणुका झाल्या. मणिपूरने सत्ताधाऱ्यांविरोधात कौल दिला. दोन खासदारांपैकी एक इम्फाळच्या खोऱ्यातून, तर दुसरा डोंगराळ भागातून निवडून आला. जे पठारी भागातून निवडून आले, ते मैतेयींचे प्रतिनिधी आणि जे डोंगराळ भागातून निवडून आले ते कुकींचे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठरावावर एका खासदाराला बोलायची संधी मिळाली, दुसरे राहिले. मणिपूरमधील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन दुसऱ्या लोकप्रतिनिधींनाही मिनिटभर बोलायची संधी मिळावी यासाठी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बराच आटापिटा केला, पण यश आलं नाही. उलट सभागृहात त्यावरून प्रचंड गोंधळ झाला. राजकीय रणनीतीचा भाग म्हणून राहुल यांनी अधिवेशन संपताच मणिपूरला भेट दिली. ते यापूर्वीही तिथे गेले आहेत. त्यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' त्यांनी मणिपूरमधूनच सुरू केली होती. पण, त्याने मूळ प्रश्नाला दिलासा मिळणार नाही. कारण राहुल गांधी पंतप्रधान नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मणिपूरला भेट देऊन तिथल्या दोन्ही जमातींशी संवाद साधावा, किमान संसदेत त्याबाबत बोलावं तरी... असा विरोधकांचा आग्रह आहे. पण, त्यांना त्यातही अजूनतरी यश आलेलं नाही.

देशातल्या एका प्रांतात वर्षभरापेक्षा जास्त काळ युद्धसदृश्य परिस्थिती राहते, हे देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने योग्य नाही. त्यातही हा प्रांत जर सीमेवरचा असेल, तर परिस्थिती आणखी संवेदनशील होते. त्याची सरकारकडून तातडीने दखल घेणं आवश्यक ठरतं. दखल म्हणजे, सुरक्षा फौजा किंवा लष्कराच्या मदतीने प्रश्न तसाच ठेऊन शांतता प्रस्थापित करणं नव्हे. अशी शांतता वरवरची असते. ती फार काळ टिकत नाही. पृष्ठभाग शांत दिसला तरी निखारा आतून पेटताच असतो. मणिपूरमध्ये तेच दिसतं आहे. सपाट भागात मैतेयी आणि डोंगराळ भागात कुकी अशी मणिपूरची फाळणी झाली आहे. दोन्ही बाजूंकडे मुबलक शस्त्रं, शस्त्रसाठा आहे. दोन देशांच्या सीमारेषांमध्ये जसा निर्मनुष्य भाग तयार केला जातो, तसा या दोन्ही बाजूंच्या मध्ये दोनएक किलोमीटरचा निर्मनुष्य पट्टा तयार करण्यात आला आहे. दोन्ही बाजूंपैकी कोणीही विरोधी बाजूला जाऊ शकत नाही. अन्य जमातीतला असा कोणी येऊ नये, यासाठी दोन्ही बाजूंनी आपापल्या गावांबाहेर 'चेकपोस्ट' तयार केले गेले आहेत. तिथे २४ तास महिला बसून असतात. त्या आल्यागेल्याची कसून तपासणी करतात. इम्फाळ ही मणिपूरची राजधानी. या राजधानीभोवती बहुतेक सगळ्या सुविधा असल्यामुळे त्यांचा लाभ मैतेयी जमातीला मिळतो आहे. प्रशासनही त्यांच्याच हातात आलं आहे. कुकींना प्रशासकीय अडचणी येत आहेत. शिवाय, आरोग्यसेवांचा मोठा प्रश्न झाला आहे. तातडीच्या वैद्यकीय मदतीसाठी त्यांना मिझोराममधील आयझॉल गाठावं लागतं आहे. तो १०-१२ तासांचा पूर्ण अवघड घाटरस्ता आहे. बरं, तिथेही मोठ्या शस्त्रक्रियांची सोय नाहीच. त्यासाठी आयझॉलपर्यंत रस्त्याने प्रवास करून पुढे विमानाने आसाममध्ये गुवाहाटीला जावं लागतं. विस्थापितांच्या छावण्यांची परिस्थिती तर बिकट आहे. तिथे सामान्य सुविधा नाहीत, दिवसातले कित्येक तास वीज नाही. दाटीवाटीने कोंबून कुटुंबं ठेवली आहेत. मुलांचं शिक्षण ठप्प आहे. रोजगार नाही, त्यामुळे कमाई नाही. सरकार जे वाटतं, ते पुरत नाही. हिंसाचाराचा कधी भडका उडेल आणि त्यात आपल्या सग्यासोयऱ्यांचा बळी जाईल ही भीती. अशा प्रचंड अनिश्चिततेत, भीतीच्या छायेखाली आपल्या देशातला एक प्रांत वर्षभर खितपत पडला आहे. तिकडे लक्ष देण्याची गरज सरसंघचालक मोहन भागवत यांना त्यामुळेच जाहीरपणे बोलून दाखवावी लागली.

दोन्ही बाजूंच्या तरुणांच्या हाती असलेली अत्याधुनिक शस्त्रं ही तिथली सर्वात काळजीची बाब आहे. गेल्या वर्ष-दीड वर्षांत भारतीय लष्कर, निमलष्करी दलं आणि पोलीस अशा तिघांच्याही शस्त्रसाठ्यांत मोठ्या चोऱ्या झाल्याच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत. या 'चोऱ्या'च मुळात संशयास्पद आहेत. दोन्ही बाजूंना पद्धतशीरपणे ही शस्त्रं पुरवली गेली आहेत, असा आरोप तिथे उघडपणे होतो आहे. भारत म्हणजे काही अमेरिका नाही. इथे शस्त्र परवाना सहजासहजी मिळत नाही. मग या विनापरवाना बाळगल्या आणि चालवल्या जाणाऱ्या शस्त्रांची माहिती आपल्या सुरक्षा दलांना नाही का? जी शस्त्रं सुरक्षा दलांशिवाय अन्य कोणाकडे असण्याची शक्यताच नाही, अशी शस्त्रं सर्रासपणे गस्तीसाठी वापरली जाताहेत आणि यंत्रणा त्याकडे पाहत राहताहेत; त्या कशासाठी? आपल्या शस्त्रसाठ्यांतून झालेल्या चोरीचा तपास लावण्याची आणि चोरीचा माल हस्तगत करण्याची गरज या यंत्रणांना का वाटत नाही आहे? सीमेवरच्या संवेदनशील राज्यांत हे जमातयुद्ध पेटवत ठेऊन कुणाचा फायदा होणार आहे? याची उत्तरं जितक्या लवकर मिळतील, तितकी देशाच्या सीमा सुरक्षेबाबतची चिंता मिटेल. मणिपूर आणि त्यामुळे क्षतीग्रस्त झालेल्या मिझोरामची चिंता संपूर्ण देशाने करायला हवी. तिथले जमातींचे म्होरके आणि त्यांच्या खाजगी सेना निःशस्त्र करणं हा त्यातला पहिला जालीम उपाय आहे. देशांतर्गत सुरक्षेसाठी ते प्राधान्याने करावे लागेल. हे होत नाही तोपर्यंत मणिपूरच्या आगीत तेल पडण्याचं थांबणार नाही!

# महानगरातील इमारती खचताहेत...

एका नवीन संशोधनात असे दिसून आले आहे की, जगभरातील महानगरांमध्ये असलेल्या इमारती खचण्याचा एक 'निःशब्द धक्का' जगाला बसू शकणार आहे. हवामान बदलामुळे जमिनीमध्ये विकृती निर्माण होत असून त्याचा परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणावर निवासी आणि कार्यालयीन इमारती खचू शकतील. याचे एक कारण असेही सांगितले जात आहे की, या इमारतींची बांधकामे झाली त्यावेळी हवामान बदलाचे असे खास कारण लक्षात घेतले गेले नव्हते. काही दशकांच्या पूर्वीपासून उंच इमारतीसाठी आराखडा तयार होत असताना मुख्यतः भूकंप विरोधक कारवाई करणे गरेजेचे असायचे.

शहरांमधील आज निर्माण होणाऱ्या इमारतींना शासकीय नियमानुसार काम करावे लागते, त्यामुळे त्यांच्यावर अशा हवामान बदलाचा परिणाम कमी होईल; परंतु मोठ्या शहरांमधील जे जुने भाग आहेत तेथील इमारती मात्र यात सापडू शकतील, उदाहरणच द्यायचे झाले तर व्हेनिस या शहराचे देता येईल. कारण हे शहर खचण्याची सुरुवात कधीच झाल्याचे मानले जाते. हे एक पथदर्शक संशोधन असून त्यामध्ये प्रथमच जागतिक हवामान बदलाचे परिमाण किती असेल याचा अनेक बाजूंनी विचार केला गेला आहे. अमेरिकेतील नॉर्थइस्टर्न विद्यापीठाच्या संशोधकांनी यासाठी प्रथमच जमिनीखालचे हवामान बदल लक्षात घेतले आहेत. शहरी वस्तीच्या खाली असलेल्या जमिनीची प्रत आज किती कमी झाली याचा शोध घेतला. हे संशोधन कम्युनिकेशन्स इंजिनिअरिंग या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे.

या संशोधनाचे सार सांगताना असे म्हटले गेले आहे की, जेव्हा जमीन तापते तेव्हा जमिनीत विकृती येणे स्वाभाविक असते. ही विकृती वारंवार प्रस्न आणि आकुंचन यामुळे होत असल्याने जमिनीच्या आतली हालचाल वाढते. इमारत नवीन असली तरी काही वेळी तिच्या काही भिंतीमध्ये भेग पडलेली आढळते. ती फार मोठी नसली तरी कुठेतरी इमारतीच्या स्थिरतेवर प्रश्न निर्माण होऊ शकतो. परंतु, आजवर हा विषय कधी चर्चेत आला नाही आणि त्यामुळे सामान्य माणूस अशा माहितीपासून वंचित राहिला. काही ठिकाणी केवळ भिंतीच नाहीत तर इमारतीच्या पायाला भेगा पडण्याचे प्रकार आहेत. इमारतीची कामगिरी उपयोगिता आणि दीर्घकालीन टिकावूपणा यावर प्रश्न निर्माण होऊ लागले. संशोधन चमूला असेही आढळले की, गेल्या काही वर्षांतील वाढते तापमान काही इमारतींना धोक्याचे ठरले असले तरी येता काही काळ तर तापमान वाढतेच राहणार असेही सांगितले जाते. संशोधकांचा दृष्टिकोन हा नेहमी सकारात्मक असायला हवा आणि तो या बाबतीत दिसला. हा धोका असला तरी याचा उपयोग आपण काही संभाव्य संधीसाठी करू शकतो. वाहतूक यंत्रणा, तळघरातील मोटार वाहनतळ आणि याच तळघरातील उद्योग यांच्यामधून निघणाऱ्या भूगर्भातील टाकावू उष्णतेचे उत्सर्जन यांचा जर आपण उपयोग करून घेऊ शकलो, तर या परिस्थितीवर मात करणे शक्य आहे. ही उष्णता कमी झाली तर पृथ्वीचा भूभाग आतून सामान्य राहील आणि इमारती खचण्याचे प्रमाण कमी होईल. अर्थात, भविष्याचा विचार करून दाखवलेल्या या धोक्याला आपण योग्य ताकीद मानायला हवी इतके निश्चित!

# एफडीआय हवीच, पण अंकुशासह

एफडीआय, अर्थात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक. तिच्याविषयी बरीच उलट-सुलट चर्चा होत असते. तरीही दरडोई उत्पन्न, जीडीपी वृद्धी दर इत्यादी प्रमाणे तिचा विकासाचा निदर्शक म्हणून वापर केला जातो. जेवढा अधिक एफडीआय तेवढा अधिक विकास, असाच राज्यकर्ते व जनतेचा समज आहे. राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये अधिकाधिक एफडीआय आकर्षित करण्यासाठी लागलेली चढाओढ हे त्याचेच निदर्शक. राज्याला कर्जाचा बोजा असह्य झालेला असतानाही विदेशी कंपन्यांवर सोयी, सवलतींचा पाडला जाणारा पाऊस, भल्यामोठ्या शिष्टमंडळासह खासगी विमानाने डावोस परिषदेला लावली जाणारी हजेरी हे सर्व त्या एफडीआयसाठीच. महाराष्ट्रही याला अपवाद नाही. परिषदेत कंपन्यांच्या उच्च पदस्थांकडून एफडीआय गुंतवणुकीच्या दिल्या गेलेल्या आश्वासनांची कितपत पूर्तता होते हाही खरे तर प्रश्नच.

गुजरात, कर्नाटक, तामिळनाडूकडून होत असलेल्या तीव्र स्पर्धेनंतरही महाराष्ट्राने एफडीआय आकर्षित करण्यातील आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. पुढे ते तसेच राहील हे मात्र सांगता येत नाही. कारण नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्राचे अव्वल स्थान कायम राहिले असले तरी राज्याच्या एफडीआयमध्ये केवळ दोन टक्केने वाढ झालेली आहे. तर तामिळनाडू व गुजरातच्या बाबतीत हे प्रमाण अनुक्रमे १२ व ५५ टक्के आहे. महाराष्ट्रासारखीच स्थिती देशपातळीवर आहे असे म्हटल्यास वावगे नाही. कारण देशपातळीवरील एफडीआयचे प्रमाण पाच वर्षांच्या निच्चांकी पातळीला असल्याचे म्हटले जाते. एफडीआय आकर्षित करण्यातील जागतिक क्रमवारीतील भारताचे स्थान ८ वरून १५ पर्यंत (२०२३) खाली घसरले आहे. एकेकाळी (२०१६) एफडीआयचे जीडीपीशी प्रमाण १.७ टक्के होते. ते आता ०.५% पर्यंत खाली आले आहे. मागील एक वर्षाच्या काळात एफडीआयमध्ये ६२ टक्क्यांनी घट झाली असल्याचे रिझर्व बँकेचा अहवाल सांगतो. परकीय गुंतवणूकदारांच्या पसंतीस भारत पूर्णपणे उतरलेला असताना ही घट होतेय हे विशेष. वास्तविकपणे ही घट केवळ भारतापुरती मर्यादित नाही, तर सर्वच विकसनशील राष्ट्रे या समस्येने त्रस्त आहेत. या घटीला अंतर्गत तशीच बाह्य कारणे जबाबदार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जागतिकीकरणाला तीन दशकांचा काळ उलटून गेला आहे. त्याच्या बऱ्या वाईट परिणामांचा अनुभव एवढ्या काळात सर्वच देशांनी घेतलाय. म्हणूनच की काय आता जगभर जागतिकीकरणविरोधी वारे वाहू लागले आहेत. भारतही त्याला अपवाद नाही. सत्ताधाऱ्यांचा आत्मनिर्भरतेचा अट्टाहास 'मेक इन इंडिया' उत्पादन जोडणी प्रोत्साहन (पीएलआय) सारख्या योजना ही त्याची काही उदाहरणे. याशिवाय प्रगत देशांच्या अर्थव्यवस्थांचा मंदावलेला वेग, व्याजदर व जागतिक आर्थिक अनिश्चिततेत झालेली वाढ ही कारणे त्या घटीला जबाबदार आहेत.

भारताला पायाभूत सोयींची उभारणी, त्यांचे नूतनीकरण यासाठी जशी परकीय भांडवलाची गरज आहे, तशीच त्याबरोबर येणारे डॉलर, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, कौशल्य, बाजारपेठीय अनुभव यांचीही गरज आहे. विदेशी कंपन्यांच्या आगमनामुळे स्पर्धात्मक वातावरणातून वस्तू व सेवांच्या दर्जात झालेली सुधारणा, रोजगारात झालेली वाढ, सामान्य नागरिकाला हवीच आहे. परकीय भांडवलातून उभारले जाणारे उद्योग, व्यवसाय भारतासाठी नवीन नाहीत. ब्रिटीश राजवटीतच याला सुरुवात झाली होती. रेल्वे, सिंचन प्रकल्पांच्या उभारणीसाठी लागणारे भांडवल ब्रिटनकडूनच येत होते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने नियोजनाच्या माध्यमातून विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू केली. तत्कालीन राजकीय नेत्यांच्या परकीय भांडवलाविषयीच्या असलेल्या संशयास्पद दृष्टिकोनामुळे परकीय गुंतवणुकीचे प्रमाण कमी होते. त्यांचा भर स्वयंपूर्णतेवर, आयात पर्यायीकरणावर होता. ऐंशीच्या दशकात हळूहळू यात बदल व्हायला सुरुवात झाली. नव्वदच्या दशकात आर्थिक सुधारणांच्या माध्यमातून काही अपवादात्मक क्षेत्रे वगळता बाकीची क्षेत्रे परकीय गुंतवणुकीसाठी मुक्त करण्यात आली. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर (१९९५) तर ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली. भली मोठी बाजारपेठ, युवकांची मोठी संख्या, स्वस्त श्रम याही भारतासंबंधित गोष्टी परकीय गुंतवणूकदारांना खुणावत होत्याच. या सगळ्या बाबींच्या एकत्रित परिणामातून परकीय गुंतवणुकीत वेगाने वाढ होत गेली. मागील दोन दशकांत या गुंतवणुकीत २० पटीने वाढ झाली असल्याचे सांगितले जाते. या काळात हा आकडा ९७१.५२ अब्ज डॉलरवर गेला. एफडीआयचा मोठा वाटा (७० टक्के) समभागाच्या स्वरूपात असल्या कारणाने इतर भागधारकांप्रमाणे समभागधारकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा व मतदानाचा हक्क असतो. वाहन निर्मिती, औषध निर्माण, बँकिंग, विमा, हार्ड व सॉफ्टवेअर ही एफडीआयची प्राधान्य क्षेत्रे मानली जातात. अलीकडेच केंद्र सरकारने दूरसंचार, रसायने, खनिजतेल, संरक्षण, साहित्य निर्मिती या क्षेत्रातील एफडीआयच्या मर्यादेत वाढ केल्यामुळे तिच्यात आणखी वाढ होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. भारतात केल्या जाणाऱ्या एफडीआयमध्ये सिंगापूर, मॉरिशस, अमेरिका, नेदरलँड, जपान हे देश आघाडीवर आहेत. यात कधी सिंगापूर आघाडीवर असतो तर कधी मॉरिशस.

वरवर विचार करता एफडीआय म्हणजे गुंतवणूक केलेल्या देशाचा फायदाच फायदा असाच समज होतो. खरेतर हे दुधारी शस्त्र आहे. याचे जसे फायदे आहेत, तसे तोटेही आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्या येताना भांडवलाबरोबर तंत्रज्ञानही आणतात. परंतु, यामुळे भारतासारख्या देशातील मध्यम, छोटे उद्योग व्यवसाय बंद पडतात. त्यांच्या मालक व कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळते. हे आताच घडतेय असे नव्हे, तर पूर्वी ब्रिटीश अमदानीत असाच प्रकार घडला होता. कापड गिरण्या आल्यानंतर हातमाग, विणकर देशोधडीला लागले, हा इतिहास फार जुना नाही. अमेझॉनमुळे छोटे, मोठे सर्वच देशी व्यावसायिक अडचणीत आले आहेत. काहींना तर आपला व्यवसाय गुंडाळावा लागला आहे. राज्यकर्त्यांकडून एफडीआयची घोषणा करतेवेळी अमूक एवढे रोजगार निर्माण होणार, अशी घोषणा केली जाते. बहुतेक वेळा हा आकडा फुगवून सांगितला जातो. कारण त्याची पडताळणी करणारी यंत्रणाच आपल्याकडे अस्तित्वात नाही. कामगार कायद्याचा आदर करण्यापेक्षा भंग करण्याकडेच या कंपन्यांचा कल असल्याचे सांगणारी अनेक उदाहरणे आहेत. याला दुर्दैवाने आपल्याकडील ढिसाळ, भ्रष्ट प्रशासन व्यवस्थेची साथ असते. वाहन निर्मितीतील आघाडीची असलेली कंपनी आपल्या कामगारांना कायम न करता वर्षानुवर्षे त्यांना करार तत्वावर ठेवून, आपल्या नफ्याचे आकडे फुगवण्यात धन्यता मानते हे सर्वश्रूत आहे. काही कंपन्यांमध्ये उद्दिष्टपूर्ती केल्याशिवाय कर्मचाऱ्यांना पाणी पिण्यासाठी व नैसर्गिक विधीसाठीही सोडले जात नसल्याची बातमी वर्तमानपत्रात अलीकडेच झळकली होती. त्याची संबंधितांनी कितपत दखल घेतली, हे गुलदस्त्यात राहून गेले. मुळात एफडीआयमधून उभ्या राहिलेल्या कंपन्या भारताकडे एक उदयोन्मुख बाजारपेठ म्हणूनच बघतात. अधिकाधिक नफा कमावून तो मायदेशी पाठवणे या एकमेव उद्देशाने त्या प्रेरित झालेल्या असतात. त्यासाठी भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब करायला त्या मागेपुढे पाहत नाहीत. नफा, व्याज संपादन, हक्क इत्यादी मार्गाने या कंपन्यांकडून मायदेशी पाठवल्या जाणाऱ्या रकमेत सातत्याने वाढ होतेय. २०१४ साली या कंपन्यांनी वेगवेगळ्या स्वरूपात पाठवलेल्या रकमेचे प्रमाण एफडीआयसी १५ टक्के होते, ते आता (२०२४ साली) ६३ टक्क्यांवर गेले. नेमक्या आकड्यात सांगायचे तर या एका वर्षात या कंपन्यांनी ४४ अब्ज डॉलर मायदेशी पाठवले आहेत. याच कारणास्तव काहींनी या कंपन्यांना संधीसाधू म्हटलंय. ते योग्य का अयोग्य या वादात न पडता. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला भांडवल व आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेसाठी एफडीआयची मदत घेण्याशिवाय गत्यंतर असत नाही. फक्त त्यांच्यावर अंकुश राहील, हे पाहणे गरजेचे आहे.

# सॉक्रेटिस आणि त्याच्या मृत्यूचे चित्र

जगाच्या इतिहासाच्या पानांवर अनेक महापुरुषांच्या वीरमरणांच्या नोंदी आहेत. महापुरुषांचे मृत्यू अनेक विद्रोहांना जन्म देणारे असतात. सभोवतीच्या माणसांच्या वेदना समजून घेण्यासाठी आयुष्य पणाला लावणारी माणसे इतिहासाच्या पानांवर विचार आणि विद्रोहाची अमीट मुद्रा उमटवत असतात. या महानायकांचे विचार आणि कार्य मृत्यूमुळे संपत नाही. महापुरुषांचे वीरमरण त्यांच्या विचार आणि विद्रोहाला चिरंजीव करीत असते.

असंख्य वेदनांच्या आगीत जळूनही महापुरुषांचे विचार आणि विद्रोह राख होतच नाहीत उलट ते सोन्यासारखे उजळून निघतात. पुढील पिढ्यांना विचारांचा प्रकाश देतात. वीरमरण पत्करणाऱ्या महापुरुषांचे विचार आणि विद्रोह इतिहासाच्या पानांवर आणि युगानुयुगे माणसांच्या मनांवर अधिराज्य करीत असतात.

नीतिमत्तेचे, सद्गुणांचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या ज्ञान आणि सत्याचा आग्रह धरणाऱ्या सॉक्रेटिसने धीरोदात्तपणे विषाचा प्याला प्राशन करण्याची शिक्षा भोगली. सॉक्रेटिस नीतिमत्ता आणि ज्ञानाच्या क्षेत्रातील हुतात्मा झाला. सॉक्रेटिसने धीरोदात्तपणे वीरमरण पत्करले आणि जुलमी सत्ता पराभूत झाल्या. शांतपणे प्याल्यातील विष प्राशन करणारा सॉक्रेटिस विजयी झाला, त्याचे विचार अजिंक्य ठरले. जगातील सज्जन माणसांच्या मनांवर सॉक्रेटिसचे अधिराज्य आहे. सॉक्रेटिसला विषाचा प्याला देणारे रोज पराभूत होत आहेत. आपले विचारविश्व या ग्रंथात ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. के. रं. शिरवाडकर लिहितात, 'सॉक्रेटिसचे जीवन आणि त्याचा मृत्यू यांचा विचार केला, तर येशू ख्रिस्त हा



जसा धर्माच्या जगातील हुतात्मा, तसा सॉक्रेटिस हा ज्ञानाच्या जगातील हुतात्मा हे सहज जाणवते.' (पृष्ठ ६५) ज्ञानाच्या क्षेत्रातील हुतात्मा झालेल्या सॉक्रेटिसचे विचार अजूनही निर्भय सत्यकथनाचे अजेय सामर्थ्य देत आहेत. सॉक्रेटिसच्या मृत्यूच्या प्रसंगाविषयीचे कुतूहल सर्वसामान्य माणसांच्या मनात असणे स्वाभाविक आहे. सॉक्रेटिसचे जगणे, त्याची विचार करण्याची पद्धती आणि क्षमता, त्याची संभाषणशैली, त्याच्या मृत्यूचा प्रसंग या सर्व गोष्टींविषयी प्रतिभावंतांना, संशोधकांना आकर्षण वाटणेदेखील स्वाभाविक आहे.

चित्रकार जॅक लुईस डेव्हिड (खूं०ीर छङ्ग४२ ऊ्र्र१७४८-१८२५) यांनी १७८७ मध्ये सॉक्रेटिसचे वीरमरण हे चित्र काढले. जॅक लुईस डेव्हिड हा प्रतिभावंत चित्रकार होता. त्याच्याविषयी अच्युत गोडबोले आणि दीपा देशमुख लिहितात, 'निओक्लासिसिझमला फ्रेंच राज्यक्रांतीचं अविभाज्य अंग बनवण्याचं काम जॅक लुईस डेव्हिड (१७४८-१८२५) यानं केलं. तो केवळ चित्रकारच नव्हता, तर राजकारणीही होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या सुरुवातीपासून ते पहिल्या नेपोलियनच्या अस्तापर्यंतच्या काळात त्यानं त्याला प्रेरणा देणारी अनेक चित्रं काढली. फ्रेंच राज्यक्रांती जेव्हा यशस्वी झाली, तेव्हा त्याच्या चित्रांनी नेपोलियन बोनापार्टला सम्राट बनवण्यात मोठा वाटा उचलला. जॅक लुईस डेव्हिडनं नवअभिजात शैलीला पुढे नेण्यात फार मोठा हातभार लावला. डेव्हिड याला आपली चित्रं विकणं जमत नसे, पण त्यानं लावलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाच्या प्रवेश तिकिटांचंच उत्पन्न ७२००० फ्रँक एवढं झालं होतं. यावरून तो किती लोकप्रिय चित्रकार होता हे कळतं. आज लुव्र या म्युझियममध्ये त्याची चित्रं बघायला मिळतात.' (कॅनव्हास, पृष्ठ ४७७)

MIRA BHAINDAR MUNICIAL CORPOTATION
Water Supply & Sewerage Department
Indira Gandhi Bhavan,Chatrapati Shivaji Maharaj Marg.
Bhayandar (W)401101,Tal.Dis – Thane,28192828
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

No.MNP/WS & Sew/05/2024-25 Date – 11/07/2024

// Tender Notice //

Mira – Bhayander Municipal Corporation's Water Supply Department has invited the Tender for various works under water supply. The tender documents are available on www.mahatenders.gov.in website from 15/07/2024 to 29/07/2024 till 12.00 hrs. Tender shall submitted on www.mahatenders.gov.in website on or before 29/07/2024 upto 1.00 hrs

Ref. No.:- MBMC|PRO|E2325495|2024-25
Date :- 11/07/2024

Place :- Bhaindar
Date :- 11/07/2024

(Deepak Khambit)
City Engineer
Mira Bhaindar Municipal Corporation

## काकडीचा डोसा



▮ **साहित्य :** १ कप गव्हाचे पीठ, १/४ कप तांदळाचे पीठ, १/४ कप बारीक कापलेली काकडी. चवीनुसार हिरव्या मिरच्या, मीठ, थोडे तेल.

▮ **कृती :** मिक्सरमध्ये काकडी, मीठ आणि मिरची घालून चांगली पेस्ट तयार करून घ्या. त्यामध्ये गव्हाचे पीठ, तांदळाचे पीठ, रवा आणि गरजेपुरते पाणी घालून चांगले हलून घ्या. या पीठाचे नेहमीच्या डोश्यासारखे डोसे तयार करा. हे गरमागरम डोसे कोणत्याही चटणी, सॉस किंवा बटाट्याच्या भाजीसोबत खाता येतील.

**पावसाळा सुरू झाला की, त्वचेच्या समस्या डोके वर काढतात. त्वचेवर रॅश येणे, संसर्ग होणे, लालसरपणा, खाज अशा समस्या निर्माण होतात आणि यापासून बचाव करण्यासाठी नेमके काय करावे हे आपल्याला कळत नाही. मात्र काही घरगुती उपायांनी या समस्येवर उपाययोजना करता येणे शक्य आहे, ज्यामुळे तुमची त्वचा नैसर्गिक आणि चांगली राहील. काय आहेत हे उपाय जाणून घेऊया...**



## पावसाळ्यात त्वचेला जपण्यासाठी 'हे' आहेत खास उपाय

▮ **तुळस :** पावसाच्या दिवसांत अनेकांना ॲलर्जी किंवा खाज येण्याची समस्या उद्भवते. तुळस ही अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी बॅक्टेरियल असते. हवेच्या कोणत्याही बदलाशी सामना करताना तुळस उपयुक्त ठरते. आपल्याला ज्याठिकाणी त्रास झाला आहे त्याठिकाणी तुळशीचा रस किंवा पेस्ट लावल्यास फायदेशीर ठरते. या रसाने चेहरा धुतल्यास चेहऱ्याच्या सगळ्या समस्या दूर होण्यास मदत होते.



▮ **हळद :** आयुर्वेदात हळद हे अनेक गोष्टींवरील उपयुक्त असे औषध समजले जाते. अँटीसेप्टीक म्हणून ओळखली जाणारी हळद त्वचेच्या समस्येवरील उत्तम उपाय आहे. चेहऱ्यावर कोणताही संसर्ग किंवा ॲलर्जी आली असल्यास तो नष्ट करण्यासाठी हळद अतिशय उत्तम काम करते.

▮ **कोरफड :** कोरफडीचे अनेक उपयोग आपल्याला माहीत आहेत. बाजारात मिळणाऱ्या अनेक क्रीममध्येही कोरफडीचा वापर केला जातो. त्वचेला कोणत्याही प्रकारची ॲलर्जी झाली असल्यास कोरफड त्यावर उपयुक्त ठरते. त्वचेची होणारी जळजळ कोरफड लावल्याने कमी होते.

▮ **जिरे :** त्वचेच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी जिरेही अतिशय उपयुक्त असते. दिवसात ३ ते ४ वेळा पाण्याबरोबरच जिरे घेतल्यास त्वचेच्या समस्या दूर होण्यास मदत होते. जिच्यात ई-जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असते, ज्यामुळे त्वचा चांगली राहते. पावसाच्या दिवसात होणारे त्वचेचे त्रास जिऱ्यामुळे कमी होतात.



## सतत खुर्चीवर बसून काम करत असाल, तर हे वाचाच

**ऑफिसमध्ये** सतत एकाच खुर्चीवर, जागेवर बसणं शरीरासाठी नुकसानकारक आहे. अशा प्रकारच्या बसण्यामुळे त्याचा आरोग्यावर नकारात्मक, विपरीत परिणाम होत असतो. सतत टीव्ही पाहणं, कॉम्प्युटर, स्मार्टफोनवर पाहतं राहणंदेखील शरीराला नुकसान पोहोचवत असतं. काही महिन्यांपूर्वी केल्या गेलेल्या संशोधनातून याबाबत आश्चर्यचकित करणारी तथ्य समोर आली आहेत.

अमेरिकेतील मेयो येथील एका क्लीनिकमधून याबाबत संशोधन करण्यात आले. या संशोधनातून शारीरिक असक्रियता धूम्रपानाइतकीच घातक असल्याचं सांगण्यात आलं आहे.

संशोधनानुसार, खांदे, पाठ, कंबरदुखीच्या समस्येपासून ते अगदी टाइप-२च्या डायबिटीज, हृदयरोग, कॅन्सर यांसारख्या आजारांपासून स्वतःचं रक्षण करण्यासाठी चालण्या-फिरण्याचा, व्यायाम करणं आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. दिवसभर बसण्याची किंवा पडून राहण्याची सवय स्मरणशक्तीसाठी घातक असल्याचीही शक्यता संशोधनातून वर्तवण्यात आली आहे.



संशोधनादरम्यान, अधिकतर युवक जवळपास ८ तासांपर्यंत खुर्चीवर बसत असल्याचं, तसंच टीव्ही किंवा मोबाईल पाहण्यासाठी एकाच जागेवर ३ तास बसून असल्याचं समोर आलं.

शारीरिक स्वास्थ्य निरोगी राखण्यासाठी, दररोज जवळपास १० हजार पाऊलं चालणं आवश्यक आहे. आठवड्यातून ६ दिवस कमीत कमी अर्धा तास व्यायाम करणं गरजेचं आहे.

**संशोधनकर्त्यांनी ऑफिसमध्ये एकाच जागी बसण्याबाबत काही उपाय सुचवले आहेत -**

▮ ऑफिसमध्ये पाण्याची बाटली भरून न ठेवता, तहान लागल्यास जागेवरून उठून पाणी प्यावे.

▮ ऑफिसमध्ये शक्य असल्यास आपल्या जागेवरच किंवा दुसऱ्या ठिकाणी स्ट्रेचिंग करावे.

▮ नाश्ता किंवा जेवणासाठी शक्यतो कँटिनमध्ये जावे. जागेवरच खाऊ नये.

▮ शक्य असल्यास लिफ्टच्या ऐवजी पायऱ्यांचा वापर करावा.



## मधुमेहींसाठी उपयुक्त पामर किंवा जांभूळ आंबा

**उन्हाळ्याचे** दिवस हे रसदार, रसाळ आंब्याचे दिवस तर पावसाळ्यात जांभळे खाण्याची मजा काही औरच. ही दोन्ही फळे ज्यांना मनापासून आवडतात त्यांना या दोन्ही फळांची चव एकाच फळात मिळाली तर? होय या दोन्ही फळांची चव एकत्र चाखण्याची संधी आता भारतीयांना साधता येणार आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यात विकसित झालेला जांभूळ आंबा, मूळ नाव पामर मँगो, आता उत्तर प्रदेशात काही ठिकाणी लावला गेला आहे. हा आंबा मधुमेहींसाठी खूपच उपयुक्त असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत.

या जातीचे सगळ्यात पहिले रोप १९२५ साली मियामी येथे लावले गेले होते. २००१ पासून या इंटरनेटवर या विशेष आंब्याची चर्चा होते आहे. ब्राझीलमध्ये या जातीच्या आंब्याचे मोठे उत्पादन घेतले जाते. आता भारतात या जातीच्या आंब्याची लागवड केली जात असल्याचे समजते. सोशल मीडियावर त्यासंदर्भात बातम्या येत आहेत.

या आंब्याचा रंग फिकट जांभळा असून जांभूळ आणि आंबा या दोन झाडांच्या संयोगातून ही जात विकसित गेली आहे असे सांगितले जात आहे. या आंब्याची चव आंबा आणि जांभूळ यांचे मिश्रण आहे.

या आंब्यात अँटीऑक्सिडंट आहेत. याच्या सेवनाने पचन सुधारते, रक्त शुद्ध होते त्यामुळे त्वचा रोग दूर होतात, रक्तशर्करेचे प्रमाण कमी होते, वजन नियंत्रणात येते असे सांगितले जाते. या आंब्याच्या जातीचे एक नाव टोमी एटकिन असे असून यातही दोन वेगळ्या जाती आहेत. अर्थात या आंब्याच्या सेवनाचे जे फायदे सांगितले जात आहेत त्याची पुष्टी केली गेलेली नाही.

**जगातील सर्वात प्रसिद्ध इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप काही दिवसांपासून नवनवीन फीचर घेऊन येत आहे. दरम्यान, थर्ड पार्टी ॲप्सच्या वापरामुळे फॅन्सी फॉण्ट्सच्या मदतीने चॅटिंगची मजा आणखी वाढणार आहे.**

## व्हॉट्सॲपवर चॅटिंगची मजा आणखी वाढणार, फॅन्सी फॉण्ट्स वापरून कसं कराल चॅटिंग?

**व्हॉट्सॲपचा** वापर आजकाल इतका वाढला आहे की जर एखाद्याला एखादी गोष्ट सांगायची असेल किंवा एखादं महत्त्वाचं डॉक्यूमेंटही पाठवायचं असेल तर आपण मी व्हॉट्सॲप करतो असंच म्हणत असतो. त्यामुळे आजकाल मेसेज पाठवण्यापासून ते कॉलिंग आणि व्हिडीओ कॉलिंग तसंच महत्त्वाची कागदपत्रं पाठवण्यासारखी सर्वच कामं व्हॉट्सॲपवर होत असतात.

आता व्हॉट्सॲपची हीच चॅटिंग आणखी भारी आणि रंगतदार होणार आहे. तर आज आम्ही तुम्हाला एक अद्भुत ट्रिक सांगत आहोत ज्यामुळे चॅटिंगची मजा द्विगुणित होईल. व्हॉट्सॲपचा फॉंट बदलता येणार आहे. पण अजून तरी व्हॉट्सॲपने असे कोणतेही फीचर दिलेले नाही, त्यामुळे या कामात थर्ड पार्टी ॲप्स तुम्हाला मदत करतील. या ॲपचे नाव आहे स्टायलिश टेक्स्ट-फॉण्ट कीबोर्ड. तुम्ही हे ॲप कसे वापरू शकता ते आम्ही तुम्हाला सांगतो...

**व्हॉट्सॲपवर चॅटिंगचा फॉंट कसा बदलाला?**

▮ सर्वप्रथम तुम्हाला प्ले स्टोअरवर जावे लागेल. त्यानंतर Stylish Text – Fonts Keyboard टाइप करा आणि हे ॲप इन्स्टॉल करा.

▮ डाऊनलोड केल्यानंतर, ॲप उघडा आणि स्क्रीनच्या खालील उजव्या कोपऱ्यात दिलेल्या बाणावर टॅप करा.

▮ त्यानंतर Agree बटण दिसल्यावर त्यावर टॅप करा.

▮ नंतर तळाशी उजव्या कोपऱ्यात कीबोर्ड विभागात जा.

**अनोळखी कॉल होतील म्यूट**



व्हॉट्सॲपमध्ये आणखी एक नवीन फीचर्स येणार असून समोर आलेल्या माहितीनुसार व्हॉट्सॲपमध्ये अनोळखी नंबरवरून आलेला फोन व्हॉट्सॲपवर आपोआप सायलेंट होणार आहे. हे फीचर कंपनी घेऊन येणार आहे. व्हॉट्सॲपच्या नव्या फीचर्सबद्दल माहिती देणाऱ्या WABetainfo च्या रिपोर्टनुसार ॲण्ड्रॉईड 2.23.10.7 अपडेटसोबत या फीचरला कंपनी आणणार आहे. याच्या मदतीने अनोळखी नंबरवरून येणारा फोन सायलेंट करू शकतो. अनोळखी नंबरला सायलेंट करण्यासाठीची सेटिंग व्हॉट्सॲपच्या सेटिंगमध्ये प्रायव्हसी ऑप्शनमध्ये असेल. ती सेटिंग ऑन करताच हे फीचर वापरता येईल. फोन सायलेंट झाल्यावर नंतर कळण्यासाठी हा नंबर नोटिफिकेशन आणि कॉल लॉगमध्ये नक्कीच दिसेल.

## औषधी दुधी भोपळा

**दुधी भोपळा म्हटले म्हणजे अनेक जण नाके मुरडतात. मात्र तो किती गुणकारी आहे, याबद्दल तुम्हाला कदाचित माहीत नसावे. दुधी भोपळा औषधी भाजी असून त्यात लोह, कॅल्शियम, फॉस्फरस व अन्य खनिजे आहेत. तंतुमय, रेषादार तसेच जीवनसत्त्व 'क' असलेली ही फळभाजी दुर्लक्षित आहे. मात्र, आता हळूहळू त्याचे महत्त्व नागरिकांना पटत असल्याने ते खाण्याचे प्रमाण वाढले आहे.**



▮ हृदयविकाराच्या रुग्णांना दुधी भोपळ्याचा रस सकाळ-संध्याकाळ एक-एक वाटी दिल्यास रोहिण्यांमधील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

▮ दुधी भोपळ्याचा रस एक वाटी, लिंबाचा रस एक चमचा व एक चमचा मध एकत्र करून प्यायल्यास मूत्रविकार कमी होतात.

▮ रोज सकाळी काही न खाण्याआधी अर्धा वाटी दुधी भोपळ्याचा रस व एक चमचा आल्याचा रस पाण्यात मिसळून घेतल्यास स्थूलपणा कमी होतो.

▮ भोपळ्याच्या एक वाटी रसात एक चमचा मध व चिमूटभर जायफळ पूड मिसळून तयार झालेला लेप त्वचेवर लावल्याचा कांती उजळते.

▮ एक चमचा आवळा चुर्ण भोपळ्याच्या रसात मिसळून रात्री कोमट पाण्यासह घेतल्याने झोप चांगली लागते. तसेच पोट साफ होते.

▮ दुधी भोपळ्याचा एक वाटी रस एक चमचा ओवा, चिमूटभर काळे मीठ घालून गरम करून ते चाखल्याने पोटाचा फुगीरपणा कमी होतो.

▮ दुधी भोपळ्याचा रस आटवून त्यात एक मिरे व पिंगळी वाटून त्यात एक चमचा मध मिसळून त्याचे चाटण लहान मुलांना दिल्यास छातीतील कफ दूर होतो.

## फॅन्सी आणि क्लासी फ्रिलचे ड्रेस!

लहानपणी तुम्ही फ्रिलचे फ्रॉक आणि स्कर्ट घालून ठुमकत ठुमकत चालत होता. तसेच फ्रिलदार फ्रॉक, स्कर्ट आणि शर्ट सध्या चलनामध्ये आले आहेत. फ्रिलचे फ्रॉक तर मुली कॉर्पोरेट सूटसोबत घालणे पसंत करतात. कारण बोअरिंग दिसणारे फॉर्मल सूट फ्रिलच्या फ्रॉकमुळे नवीन लूकमध्ये दिसतात.

फ्रिलच्या ड्रेसचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे फेमिनीन लूक देतात आणि तुम्ही याला पार्टी वेअर ते कॅज्युअल वेअरपर्यंत घालू शकता. या प्रकारचे रफल्ड ड्रेस तुम्ही बऱ्याच डिझाईनमध्ये तयार करू शकता. जसे रफल्ड रॅप ड्रेस, सिंगल लेअर रफल्ड ड्रेस, टीर्ड रफल्ड ड्रेस.



रफल्ड ड्रेस स्टायलिश लूक तर देतातच, त्याशिवाय तुमच्या बऱ्याच समस्यांचे निदान देखील करतात. जसे तुमची बस्ट लाइन स्मॉल असेल तर अशा ड्रेसची निवड करा ज्यात फ्रिल वरच्या बाजूस दिली असेल. आणि जर बस्ट लाइन हेवी असेल तर तुमच्यासाठी अशा प्रकारचे ड्रेस योग्य राहतील, ज्यात फ्रिल व्हर्टिकली स्ट्रेट लाइनमध्ये असेल. जर तुम्ही बॉडीच्या खालील भागाला हेवी लूक देण्याचा प्रयत्न करत असाल तर खालच्या बाजूला फ्रिल असलेले फ्रॉक परिधान करणे उपयुक्त ठरेल.

सध्या बॉलीवूडच्या अभिनेत्री देखील फ्रिलने सजलेले फ्रॉक परिधान करतात. मागील काही समारंभात दीपिका पदुकोण, अनुष्का शर्मा, प्रियंका चोप्रा, सोनाक्षी सिन्हा व प्रीती झिंटा फ्रिलच्या ड्रेसमध्ये आल्या होत्या.

फ्रिलच्या ड्रेसमध्ये तुम्हाला ज्वेलरीची चिंता करण्याची गरज नसते. हे फ्रॉक बिन हेवी ज्वेलरीचे पण चांगले लूक देतात. फ्रिलदार ड्रेसला तुम्ही बऱ्याच डिझाईन व मटेरियलमध्ये तयार करू शकता. हे हलके कपडे जसे जॉर्जेट, शिफॉन, कॉटन आणि सॅटिनमध्ये जास्त चांगले लूक देतात. तर मग आता पुढच्या पार्टीत वेगळे दिसण्यासाठी एखादा फ्रिलचा ड्रेस स्वतःसाठी नक्कीच तयार करा.





## उपयोगी पडणाऱ्या ब्युटी टिप्स

▮ स्टीम बाथ घेण्यापूर्वी शक्य तितके जास्त पाणी प्यावे म्हणजे डिहायड्रेशनचा त्रास होणार नाही.

▮ नाक, तोंडावर कपडा बांधून स्वयंपाकघराची स्वच्छता केल्याने धुळीचे कण शरीरापर्यंत पोहोचत नाहीत.

▮ कैरीच्या कच्च्या पांढऱ्या बिया, मेंदी, कडूलिंबाची पावडर यांचे मिश्रण केसांकरिता उपयोगी असते.

▮ नेल ब्लिच तयार करताना सायट्रिक ॲसिड किंवा हायड्रोजन पेरॉक्साईडचा वापर साधारणपणे केला जातो.

▮ रात्री झोपताना लिंबाचा रस, गुलाब पाणी व ग्लिसरिन लावा. हात-पाय मऊ व चकचकीत होतात.

▮ स्विमिंग करताना स्विमिंग कॅप वापरावी. कारण पूलच्या पाण्यात क्लोरिन जास्त असल्यामुळे केस खराब होतात.

▮ केसांमध्ये हेअर ड्रायरचा वापर कमीत कमी करावा. कारण, केस गळण्यास सुरुवात होते तसेच ते द्विभाजितही होतात.

▮ नॅचरल मेकअपसाठी फाऊंडेशन लावल्यानंतर दोन मिनिटानंतर पावडर लावायला पाहिजे. त्याने फाऊंडेशनमुळे पडणारे चकते दिसणार नाही.

▮ जरदोसी मेंदी सिल्व्हर किंवा गोल्डन शेडमध्ये असते. मेंदीने हातांवर सिल्व्हर किंवा गोल्डन रंगाने डिझाइन बनवण्यात येते.

▮ चौपाटी किंवा एखाद्या डोंगरावर ट्रेकिंगला जाण्याचा प्लान करत असल तर आपल्या त्वचेची काळजी घ्यायला विसरू नका.

▮ गुडघ्यापर्यंत मिडी किंवा मिनी स्कर्टसोबतसुद्धा लॅगिंग्सचा वापर करता येतो. लाँग स्कर्टसोबत स्लॅक्स वापरू शकता.

**डायबेटिसच्या रुग्णांनी खाण्या-पिण्याबाबत विशेष पथ्य पाळणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. शुगर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठीच या टिप्स..**

## शुगरवर कंट्रोल ठेवण्यासाठी हे टाळा...

▮ साखरयुक्त पदार्थ, मध, सरबत, सिरप, कोल्ड ड्रिंक्स, गूळ, तूप, केक, पेस्ट्री, आईस्क्रीम, दारू, बीयर आदींचे डायबेटिसच्या रुग्णांनी सेवन करू नये. ▮ ज्या भाज्या जमिनीत येतात, उदा. बटाटे, रताळे, इत्यादी भाज्या खाणे टाळावे. ▮ केळी, चिकू, आंबा, सीताफळ, द्राक्ष, पपई, पेरू, ऊस आदी फळे वर्ज्य करावीत. ▮ काजू, मनुका, बदाम, भुईमुगाच्या शेंगा, अक्रोड आदी सुकामेवा टाळावा. ▮ मांसाहार टाळावा. ▮ भात, वरण, दूध, पनीर, दही, मासे आदी पदार्थ कमी प्रमाणात खावेत. ▮ कच्च्या भाज्या उदा. मेथी, पालक, दुधी भोपळा, मुळा, कोथिंबीर, गोबी, चवळी, टोमॅटो, कांदा, कारले, कांद्याची पात, कैरी, लिंबू पाणी आदी पदार्थ भरपूर प्रमाणात खावे




**दररोज व्यायाम करणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे. व्यायाम केवळ फिट ठेवत नाही तर अनेक आजारांपासूनही संरक्षण करतो. पण व्यायाम करण्यासाठी अधिक ऊर्जेची गरज भासते. त्यामुळे आहारात योग्य त्या पदार्थांचा समावेश करणं आवश्यक आहे.**

## दररोज व्यायाम करणाऱ्यांनी आहारात 'या' पदार्थांचा समावेश करा

**प्रोटीन :** शरीराच्या वजनानुसार, दररोज ०.९ ग्रॅम प्रोटीन आपल्या आहारातून घेणं गरजेचं आहे. जर तुम्ही वजन नियंत्रणात राखू इच्छिता तर कॅलरीचं प्रमाण तपासणं महत्त्वाचं आहे.

**फळे :** जितकं शक्य आहे तितकं आहारात फळांचा समावेश करा. फळांमध्ये पुरेशा प्रमाणात फायबर असतं. व्यायाम करण्याच्या जवळपास दोन तासांपूर्वी आणि त्यानंतरही केळे खाणे शरीरासाठी फायदेशीर आहे. संत्री, द्राक्षही फायदेशीर ठरतात.



**कार्बोहायड्रेट :** कार्बोहायड्रेट प्रोटीनच्या तुलनेत शरीराला लवकर ऊर्जा प्रदान करतात. याची व्यायामावेळी अधिक आवश्यकता असते. कार्बोहायड्रेट मांसपेशींमध्ये ग्लायकोजनची गरज भरून काढण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे आहारात फरसबी, ब्राऊन राइस यासारख्या पदार्थांचं सेवन करणं महत्त्वाचं ठरतं. व्यायाम करण्याआधी ५० ग्रॅम कार्बोहायड्रेट घेण्याचा सल्ला दिला जातो.

**बदाम दूध किंवा ओट्स दूध :** व्यायाम करण्याआधी बदाम दूध किंवा ओट्स दूध पिणं आवश्यक ठरतं. हे शरीराला पुरेशी ऊर्जा पुरवण्याचं काम करतात. यामुळे व्यायाम करतानाही ऊर्जा मिळते. तसंच शरीराला पुरेसं पोषणही मिळण्यास मदत होते.

**स्ट्रॉबेरी फारच आकर्षक दिसते, त्यामुळे पाहताक्षणीच खावीशी वाटते. आंबट-गोड चवीचं हे फळ थंडीच्या दिवसात मिळतं. स्ट्रॉबेरीचा आकार लहान असला तरी आरोग्याच्या दृष्टीने ती फारच गुणकारी आहे. स्ट्रॉबेरी हे मेंदूचं खाद्य असल्याचं एका संशोधनातूनही समोर आले आहे. भरपूर अँटीऑक्सिडंट्स असल्याने स्ट्रॉबेरीच्या सेवनाने मेंदूची क्षमता वाढते. इतर अनेक रोगांवरही हे फळ उपयुक्त ठरतं. चला जाणून घेऊ स्ट्रॉबेरीचं आपल्या आहारातील महत्त्व...**

## बहुपयोगी स्ट्रॉबेरी

▮ दिवसाला तीन ते चार स्ट्रॉबेरी खाल्ल्याने स्मरणशक्ती तसेच एकाग्रता वाढायला मदत होते.

▮ स्ट्रॉबेरी हे पोटॅशियम आणि 'क' जीवनसत्त्वाने समृद्ध फळ आहे. हे दोन्ही घटक तुम्हाला उत्साही ठेवण्यास मदत करतात.



▮ वाढत्या वयात त्वचेवर सुरकुत्या पडतात. पण स्ट्रॉबेरीमुळे या सुरकुत्यांचं प्रमाण कमी होतं.

▮ स्ट्रॉबेरी खाल्ल्याने तुमची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

▮ हार्मोन्सचं संतुलन तसंच हाडांच्या आरोग्यासाठी स्ट्रॉबेरीचा आहारात समावेश करायला हवा.

▮ शरीरावर आलेली सूज स्ट्रॉबेरीच्या सेवनाने कमी होते.

▮ कॅन्सरपासून बचाव करण्याची क्षमता स्ट्रॉबेरीत आहे.

▮ केस आणि त्वचा या दोन्हीचं आरोग्य राखण्यातही स्ट्रॉबेरी महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणूनच अनेक सौंदर्यप्रसाधनांमध्ये स्ट्रॉबेरीच्या तत्त्वांचा वापर केला जातो.

▮ स्ट्रॉबेरीतील काही गुणधर्मांमुळे सूर्याच्या अतिनील किरणांपासून केस आणि त्वचा यांचं रक्षण होऊ शकतं.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com